**<u>नि.दि.दा.क्र.७९/२०१०.</u>**
नि.क्र.१९१ लगत.
दि.१७.०१.२०२६

**<u>सा. क्र. १ चा उर्वरित उलटतपास प्रतिवादी क्र. १ अ आणि १५ तर्फे विधीज्ञ श्री. बी. व्ही. देशमुख यांच्यामार्फतः–</u>**

१२. मी माझे मूळ पुरुष यांचा मृत्यूचा दाखला आज दाखल करणार नाही. माझ्या पूर्वी सिध्दार्थ कांबळे यांनी मुखत्यारपत्र करुन घेतले होते. ते वादीपणात सामील नाही. माझे आजोबा राघोबा यांना दावा मिळकत वारसा हक्काने प्राप्त झालेली आहे हे सिध्द करण्यासाठी ७/१२ व इतर कागदपत्रे हजर केलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत आजोबांची वडीलोपार्जित मिळकत आहे हे दाखविणारा कोणताही कागदपत्र हजर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. ११६० ज्याअन्वये माझ्या आजोबांची ली रद्द झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, फेरफार क्र. ११६० मध्ये दाखविलेले सर्वे नं. १४३/१, १४३/२ व १४३/३ असे हिस्से कागदोपत्री पडलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीवर आमचे मूळ पुरुष राघू उर्फ राघोबा विठ्ठल मोरे यांचा कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, राघू उर्फ राघोबा विठू मोरे हे कधी मयत झाले व त्यांना कोण वारस होते याचा फेरफार मी न्यायालयात हजर केलेला नाही. साक्षीदार म्हणतो, फेरफार क्र. ११६० हजर केलेला आहे.

१३. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविण्यात आलेला नि. ३६/१ वरील फेरफार क्र. ३७५ मध्ये शंभू विठू महार आणि धोंडी बाळा महार यांना ८ आणे हिस्सा प्राप्त असल्याचे नमूद केलेले आहे, जे खरे व बरोबर आहे. सदरचा उलटतपास मान्य केल्यामुळे आणि पब्लीक डॉक्युमेंट असल्यामुळे त्यास **<u>नि. २३७</u>** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचा फेरफार हा प्रिंटेड फॉर्ममध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, शंभू विठू महार हे प्रतिवादींचे मूळ पुरुष असून ते १९५० साली मयत झाले आणि त्याबाबतचा फेरफार क्र. १०७६ असा झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, सुदाम धोंडी मोरे हा राघू विठू मोरे यांच्या वंशवेलातला नाही. हे म्हणणे खरे आहे की, सुदाम धोंडी मोरे हा धोंडी बाळा महार यांचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे चुलते काशिनाथ राघू मोरे यांची एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून कधीही नोंद झालेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील परिच्छेद क्र. ५ अ मधील मजकूर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत मला अथवा माझ्या पूर्वजांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, कै. शंभू विठू महार व त्यांच्या वारसांनी प्रतिवादी क्र. १५

यांना करुन दिलेले बिनताबा साठेखत क्र. कडग ४६२२/२००९ आणि त्या आधारे रजिस्टर खरेदीखत क्र. १७५५/२०११ करुन दिलेले दावा मिळकतीबाबतचे दस्त हे कायदेशीर आहे.

१४.        हे म्हणणे खरे आहे की, नि. २०० वरील ७/१२ ला राघू विठू मोरे यांच्या कोणत्याही वारसांच्या नावाची नोंद नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि. २०१ वरील ७/१२ रद्द झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत गट नं. ९२४ ज्याचा मूळ सर्वे नं. १४३ होता तो एकूण २५ एकरचा होता. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीत धोंडी बाळा याच्या वारसांनी त्यांच्या हिस्स्यातील क्षेत्र विकलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे गट नं. ९२४/१ आणि ९२४ च्या धोंडी बाळा याने विकलेल्या क्षेत्रात आमचे नाव राहिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यात धोंडी बाळा यांच्या वारसांना सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, कोंडाबाईच्या सर्व कायदेशीर वारसांना दाव्यात समाविष्ट करुन घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रस्तुतचा दावा खोटा व लबाडीचा केलेला आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

Sd/-
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. १७.०१.२०२६.